C M Y K

मराठा-मुस्लिम-दलित बांधवांनी आ.संदीप क्षीरसागर यांच्यासाठी बांधली वज्रमुठ!

दिन
की शुरुवात पॉजिटिव सोच के साथ..!
www.divyavastav.com

साप्ताहिक दिव्य
वास्तव
संपादक - सचिन पवार

निवडणुकांचा रणसंग्राम

बीड-महाराष्ट्र ■ वर्ष -१ ■ अंक २० ■ सोमवार, दि. १७ ते २४ नोव्हेंबर, २०२५ ■ टिसी-एमए एच एमए आर५२६७८ ■ किंमत २ रूपये ■ पाने ४

BEED-MAHARASHTRA ■ YEAR -1 ■ ISSUE-20 ■ Monday 17 To 24 Novemberr , 2025 ■ TC : MAHMAR52678 ■ Price-2 Rupees ■ Pages : 4

जय भीम चा एल्गार; घडी फोडा, तुतारी वाजवा!

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार

खऱ्या भीमकन्या स्मिता वाघमारे यांना विजयी करा : पप्पू कागदे

आंबेडकरी समाजावर अन्याय करणाऱ्यांची मस्ती जिरवा : अजिंक्य चांदणे

आंबेडकरी चळवळीतील नेत्यांचा व समाजाचा घडीला फोडण्याचा एकमुखी निर्णय!

तुतारीला पाठिंबा ; नगराध्यक्षासह नगरसेवक पदाच्या सर्व उमेदवारांच्या विजयावर शिक्कामोर्तब

बीड । प्रतिनिधी

बीड नगरपालिकेमध्ये अनुसूचित जाती महिलांसाठी नगराध्यक्ष पदाची जागा सुटल्यानंतर बीडचा नगराध्यक्ष कोण होणार ? कोणाला उमेदवारी दिली असत उमेदवार योग्य राहील याची चाचणी सर्व पक्षाकडून करण्यात येत होती. यामध्ये पप्पू कागदे यांना घडी कडून नगराध्यक्षपदासाठी वापर देत तयार करण्यात आले परंतु ऐनवेळेस पप्पू कागदे यांना डावल्यामुळे सर्व समाज नाराज झाला होता. त्यानंतर आंबेडकरी चळवळीतील पप्पू कागदे अजिंक्य चांदणे यांच्यासह सर्व नेत्यांची व समाजाची बैठक वीर शहरात पार पडली. या बैठकीत सर्वांनी एक मुखी निर्णय घेत घडीला पाडण्याचा निर्णय घेतला तर खऱ्याखोऱ्या भिमकन्या तुतारीच्या नगराध्यक्ष पदाचे उमेदवार स्मिता विष्णू वाघमारे यांना पाठिंबा दिला. या पाठिंब्यामुळे निवडणुकीपूर्वीच घडीला बीड पालिकेत मोठा फटका बसला आहे तर तूतरी लयाचा मोठा फायदा होणार आहे. आमदार विजयसिंह पंडित यांना या निर्णयाचा मोठा तोटा सहन करावा लागणार आहे तर दुसरीकडे आमदार संदीप क्षीरसागर यांना या पाठिंबाचा मोठा फायदा होणार असल्याचे दिसत आहे.

बीड नगरपालिकेकडे सर्वांचेच लक्ष

बीड नगरपालिका आपल्या ताब्यात यावी यासाठी बीडमध्ये सर्वच पक्षाकडून जोरदार तयारी सुरू आहे त्यातच आंबेडकरी चळवळीतील नेत्यांनी व समाजाने घेतलेल्या निर्णयामुळे अजित पवारांना बीडमध्ये मोठा धक्का मानला जात आहे तर दुसरीकडे संदीप क्षीरसागर यांच्यासाठी हा दिलासादायक निर्णय आहे. कारण नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा लोकसभेत या प्रकारे तुतारीला मतदान झाले त्याच साखळीमध्ये जर हे मतदान झाले तर नक्कीच याचा फायदा आमदार संदीप क्षीरसागर यांना होईल असे चित्र सध्या बीडमध्ये दिसत आहे विशेष म्हणजे सध्या जो प्रचार सुरू आहे त्या प्रचारात मतदारांकडून आमदार संदीप क्षीरसागर यांच्या उमेदवारांना मोठा प्रतिसाद मिळत आहे.

मराठा-मुस्लिम-दलित एकवटले संदीप क्षीरसागर यांच्यासोबत

बीडमध्ये जातीय समीकरण असलं तरी विचाराला आणि खमक्या नेतृत्वाला सर्वच समाज डोक्यावर घेतो हे संदीप क्षीरसागर यांनी सिद्ध करून दिले आहे. मराठा मुस्लिम दलित बांधवांनी संदीप क्षीरसागर यांचे हात बळकट केले असून बीड नगरपालिकेवर संदीप क्षीरसागर तुतारी गटाची एक हत्ती सत्ता आणण्यासाठी सर्वच कामाला लागले आहेत. एकूणच संदीप क्षीरसागर यांचं नेतृत्व बीडला तारणार असल्याचा दिसत आहे.. बीडचा विश्वास संदीप क्षीरसागर यांनी जिंकला असंच म्हणावा लागेल.

अश्विलिंग देवस्थानच्या आळंदी येथील मठासाठी भाऊसाहेब भवर यांच्याकडून पाच लाखाची देणगी!

लोकनेते सुरेश अण्णांच्या माध्यमातून चार कोटी दहा लाखाचे विकास काम पूर्ण!

अश्वलिंग देवस्थानासाठी नेहमीच लोकनेते सुरेश आण्णा धस यांचं निधीच्या बाबतीत कार्य मोठे राहिले आहे. चार कोटी दहा लाख रुपयाचे विकास कामे अश्विलिंग देवस्थानासाठी करण्यात आले आहेत. विविध कामासाठी निधी वेळोवेळी अण्णांच्या माध्यमातून उपलब्ध झाला आहे. येणाऱ्या काळातही विकास कामासाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी ही अण्णा तत्पर आहेत आणि त्यांचे कार्यकर्तेही सहभाग नोंदवत फुलला फुलाची पाकळी देत आहेत..

यापूर्वी पंढरपूरच्या मठासाठी दोन लाख ११ हजार देऊन धार्मिक कार्यातील सक्रिय सहभाग

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील अश्वलिंग देवस्थान मोठे प्रशस्त देवस्थान म्हणून ओळखलं जातं. देवस्थानाच्या विकास कामासाठी लोकनेते सुरेश आण्णा धस यांच्या माध्यमातून कोट्यावधीचा निधी देखील देवस्थानाला देण्यात आला आहे तसेच धस अण्णा यांचे खंदे समर्थक भाऊसाहेब भवर यांनीही स्व इच्छेने व स्वतःच्या खिशातून सात आठ लाख रुपये देऊन धार्मिक क्षेत्रातील त्यांचं कार्य पुन्हा एकदा सर्वांसमोर ठेवले आहे. त्यांचं हे कार्य सर्वांनाच अभिमानाचा वाटत आहे... लोकनेते सुरेश आण्णा धस यांचा सच्चा शिलेदार आणि दूरदृष्टीचा नेता म्हणून भाऊसाहेब भवर यांच्याकडे पाहिले जातात. धार्मिक क्षेत्रात कोणत्याही ठिकाणी कुठेही ते मागेपुढे पाहत नाहीत आवश्यक ती मदत त्या ठिकाणी करण्याचा प्रयत्न करतात मग अन्नदानाचा असेल किंवा विकास कामासाठी असेल नेहमीच त्यांचं सहकार्य लाभत आहे. यांच्या या धार्मिक क्षेत्रातील कार्याबद्दल सर्व स्तरातून त्यांचं कौतुक आणि अभिनंदनही केलं जात आहे. सुरेश आण्णा धस यांचा हा कार्यकर्ता दूरदृष्टीचा आणि सच्चा दिलाचा कार्यकर्ता आहे असेही बोलले जात आहे. येणाऱ्या काळात असे कार्यकर्ते जर समोर आले तर सुरेश आण्णांना अभिमान वाटेल असं कार्य त्यांच्या हातून घडेल असाही विश्वास सर्वसामान्य जनतेला वाटत आहे.. जनतेच्या विश्वासाला तडा लोकनेता जाऊन देणार नाही असाही विश्वास सर्वसामान्य जनतेत आहे.

लोकनेते सुरेश अण्णा धस यांच्या मार्गदर्शनाखाली भाऊसाहेब भवर यांचंही सहकार्य मोठे

लोकनेते सुरेश आण्णा धस यांच्या माध्यमातून विविध विकास कामासाठी निधी आणला जात आहे. तसेच त्यांचे कार्यकर्तेही स्वतःच्या खिशातूनही मोठ्या प्रमाणात निधी देवस्थानासाठी देत आहेत भाऊसाहेब भवर यांनी जवळपास सात आठ लाख रुपये सो इच्छेने स्वतःच्या खिशातून देऊन सुरेश आण्णांचा सच्चा शिलेदार आणि दूरदृष्टीचा नेता म्हणून भाऊसाहेब भवर यांनी ओळख निर्माण केली आहे.

हरणाला गाडीची धडक; मित्रांच्या सहकाऱ्याने हरणाला जीवनदान

पाटोदा । प्रतिनिधी

धनगर जवळका शिवारामध्ये आज रात्री नऊ वाजता एक गाडीने हरणाला जोरदार धडक दिल्याची माहिती मिळताच गावातील सर्व मित्रमंडळी तात्काळ घटनास्थळी धावून पोहोचली. घटनास्थळी पोहोचल्यावर हरण जखमी अवस्थेत रस्त्याच्या खालील खड्ड्यात पडलेले आढळले. मित्रमंडळींनी कोणताही विलंब न करता हरणाला सुरक्षितपणे बाहेर काढले. या प्रकरणाची माहिती मजूर पवार यांनी फोनवरून दिली होती. तत्काळ वन विभागाचे पगार प्रभारी अधिकारी देवगुड यांच्याशी संपर्क साधून संपूर्ण परिस्थिती सांगण्यात आली. त्यांनी हरणाला उपचारासाठी सर्पराज्य प्रकल्प, शिरूर कासार येथे पाठवण्याच्या सूचना दिल्या.वन विभागाच्या सूचनेनुसार तातडीने वाहनाची व्यवस्था करण्यात आली आणि हरणाला सुखरूपपणे सर्पराज्य प्रकल्प, शिरूर कासार येथे रवाना करण्यात आले. त्या हरणासोबत वन मधून नागरगोजे यांचेही साथ लाभली. या संपूर्ण बचाव मोहिमेत गावातील अनेक युवकांनी पुढाकार घेत अमूल्य सहकार्य केले. त्यामध्ये अजित काळे, सावकार काळे, अविनाश काळे, सागर गाडेकर, शंकर गोरे, नाना ढेकळे, वसंत गाडेकर यांचे विशेष योगदान राहिले.

युवा नेता सचिन मेघडंबर यांच्यासह मित्र परिवाराचे योगदान

गेल्या वर्षी त्या जागेवर एक हरणाला अज्ञात वाहनाने धडक दिली होती त्यावेळी सर्व गावकऱ्यांनी मिळून आम्ही त्या हरणाचे प्राण वाचवले होते व रात्रीही सर्वांच्या प्रयत्नातून त्या हरणाला जीवदान भेटले सर्वांचे धन्यवाद..

– सचिन मेघडबर
जिल्हा उपाध्यक्ष वंचित बहुजन आघाडी बीड.

शेतकऱ्यांनी महाविस्तार एआय पचा वापर करावा : शेळके

कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना आव्हान

पाटोदा । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांसाठी विकसित करण्यासाठी करण्यात आलेल्या अत्याधुनिक महाविस्तार ए आय या मोबाईल पचा शेतकऱ्यांनी व्यापक वापर करावा असे आव्हान पाटोदा कृषी अधिकारी ओमकार शेळके यांनी केले आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित हे ॲप शेतकऱ्यांसाठी एक प्रभावी डिजिटल सहाय्यक असून, हवामान अंदाज, बाजारभाव, कीड व रोग नियंत्रण, तसेच कृषी योजना यांची माहिती एका क्लिकवर मिळते. त्यामुळे शेती अधिक स्मार्ट व फायदेशीर करण्यासाठी शेळके यांनी सर्व शेतकऱ्यांनी गुगल प्ले स्टोअरवरून हे ॲप मोफत डाऊनलोड करून वापर करावा, असे आवाहन केले आहे..

शेतकरी व जनतेला तात्काळ न्याय द्यावा,नसता तीव्र आंदोलन

शे.का.प.,शिवसेना,काँग्रेस, वंचित बहुजन आघाडीचा इशारा

पाटोदा । प्रतिनिधी

बिबट्याच्या भीतीमुळे शेतकऱ्यांना पूर्ण क्षमतेने दिवसा लाईट द्या., वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करा., नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पिक विमा योजनेत अंतर्गत भरपाई द्या., पाटोदा तालुक्यातील गायरान जमिनीवरील पोटखराब काढण्यात यावे., शेतकऱ्यांचे ३ हेक्टर पर्यंत जाहीर केलेले अनुदान तात्काळ देण्यात यावे., खरीप २०२५ मध्ये अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुसकान झाले त्यांची विमा भरपाई तात्काळ द्या., अतिवृष्टीत वाहून गेलेले किंवा मयत झालेले पशुधन यांचे नुकसान भरपाई तात्काळ द्या. आशा विषयाचे लेखी निवेदन तहसील कार्यालय पाटोदा यांना देण्यात आले आहे. मा.तहसिलदार साहेबांनी वरील विषयाची गंभीर दखल घेऊन शेतकरी व जनतेला तात्काळ न्याय द्यावा नसता तीव्र आंदोलन

करण्यात येईल. असे लेखी निवेदनाद्वारे शेकापचे भाई विष्णुपंत घोलप, उध्दव ठाकरे शिवसेनेचे मुकुंद शिंदे, काँग्रेसचे राहुल जाधव, वंचित बहुजन आघाडीचे बाळासाहेब गायकवाड व शिवसेनेचे आकाश कांकरिया वंचितचे राहुल शिरोळे यांच्या सह इतरांनी केले आहे.

जागतीक दिव्यांग दिना दिवशी दिव्यांग व्यक्तीच्या मागण्यासाठी आंदोलन करणार : जिलानी शेख,अशोक दगडखैर

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील दिव्यांग व्यक्तीच्या प्रश्नाकडे शासनास्तरातुन तहसीलदार, गटविकास अधिकारी व मुख्याधिकारी हे दुर्लक्ष करत असले बाबत दि.०३ डिसेंब २०२५ रोजी दिव्यांग दिना निमित्त तहसील कार्यालया समोर आंदोलन करण्यात येणार आहे असे दिव्यांग संघर्ष समिती चे जीलनी शेख व अशोक दगडखैर यांनी म्हटले आहे. मागण्या खालील प्रमाणे दिव्यांग व्यक्तीचे संजय गांधी योजनेचे मानधन उर्वरीत १००० रुपये हाप्ता त्वरीत वर्ग करण्यात यावा तसेच पाटोदा तालुक्यातील बऱ्याच दिव्यांग व्यक्तांना २५०० रुपये ऐवजी १५०० रुपये आले आहेत तरी सदरील दिव्यांग व्यक्तीचे कागदपत्र तात्काळ घेऊन त्यांना उर्वरीत रक्कम त्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात यावी,पाटोदा पंचायत समिती अंतर्गत दिव्यांग व्यक्तांना ५ टक्के निधी वर्ग करण्यात यावा नगरपंचात अंतर्गत दिव्यांग व्यक्तीना ५ टक्के निधी वर्ग करण्यात यावा करीता कसल्याही प्रकारची कारवाई केलेली नाही तरी दिव्यांग कायदा २०१६ अंतर्गत संबधीत गटविकास यांना दिव्यांग कल्याण विभाग जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी कार्यालय बीड यांनी आदेश देऊन ही कार्यवाही केली नाही , पाटोदा पंचायत समिती अंतर्गत दिव्यांग व्यक्तीना घरकुल योजनेचा लाभ देण्यात यावा व ज्या दिव्यांग व्यक्तीचे घरकुल योजनेत नाव आलेले आहे त्यांना तात्काळ प्रथम प्राधान्याने घरकुल योजनेचा लाभ देण्यात यावा,अंत्यादोय राशन कार्ड योजने अंतर्गत शासनाच्या पारपत्राकानुसार दिव्यांग व्यक्तीना तात्काळ जाचक अट न देता या योजनेचा लाभ देण्यात यावा ,पाटोदा तहसील अंतर्गत संजय गांधी विभाग कायमस्वरुपी तळमजल्यावर घेण्यात यावा.वरील सर्व प्रश्नावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी नसता जागतीक दिव्यांग दिनी दि.०३ डिसेंबर २०२५ वार बुधवार या दिवशी तहसील कार्यालया समोर योग्य प्रकारचे आंदोलन करण्यात येईल याची नोंद घ्यावी असे निवेदनात जीलानी शेख , अशोक दगडखैर , वैभव देशमुख , दत्ता कदम , बजरंग लांडगे , बापु पावसे ' हनुमंत काळूशे ' बांगर , संतोष गुंजाळ , शेरे कांकरीया , कैलास मकाळ यांनी म्हटले आहे.

C M Y K